उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
POST REGD.NO./DHL/53/24-26
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३१ ■ गुरूवार ३ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

### पुढील सुनावणी पंधरा सप्टेंबरला

## भाजपसोबत निवडणूक लढवून सत्ता काँग्रेससोबत स्थापल्याने पक्षात उठाव झाला : शिवसेना शिंदे गट



**नवी दिल्ली, दि. २ : भाजपसोबत विधानसभा निवडणूक लढविली. निकालानंतर काँग्रेससोबत आघाडी करून सत्ता स्थापन करण्यात आल्याने पक्षात असंतोष निर्माण झाला आणि त्यातूनच उठाव झाल्याचा दावा शिवसेना शिंदे गटाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात आज करण्यात आला. शिवसेना पक्ष आणि आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील प्रकरणाच्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान शिंदे गटाचे वकील नीरज कौल यांनी पक्षात फूट पडण्यामागील कारणांवर युक्तिवाद केला. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता १५ सप्टेंबर रोजी होणार आहे.**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. यावेळी नीरज कौल यांनी सुरुवातीपासूनच शिवसेनेतील फूट, पक्षाची विचारसरणी आणि पक्षांतर्गत रचनेशी संबंधित विविध मुद्दे मांडले. निवडणूक भाजपसोबत युती करून लढविण्यात आली होती. मात्र, निवडणुकीनंतर ज्यांच्या विरोधात निवडणूक लढली, त्यांच्यासोबत आघाडी करून सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. उद्धव ठाकरे काँग्रेससोबत गेल्याने पक्षात असंतोष निर्माण झाला आणि त्यातूनच उठाव झाल्याचे कौल यांनी न्यायालयात सांगितले.

**आमचीच मुळ शिवसेना**

पक्षाची (पान ४ वर)

### चंद्रपुरच्या आश्रमशाळेत एकतीस जणांना विषबाधा

चंद्रपूर, दि. २ : जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील नगराळा येथील श्री अम्बू नाईक माध्यमिक आश्रमशाळेतील ३१ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. १) सकाळी घडली. सकाळच्या जेवणादरम्यान काही विद्यार्थ्यांना अचानक उलट्या सुरू झाल्याने आश्रमशाळेत एकच खळबळ उडाली. जेवण तयार करताना पाल शिजल्याने विषबाधा झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत असलेली ही व्हीजेएनटी आश्रमशाळा १९९४ पासून कार्यरत आहे. आश्रमशाळेत माध्यमिक विभागाचे १६०, तर प्राथमिक विभागाचे ६८ विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यात ३४ मुले आणि ३४ मुलींचा (पान ४ वर)

### त्यांना दंगल घडवायची आहे, जरांगेंचा आरोप

## जरांगेंची प्रकृती खालावल्याने मराठा आक्रमक टायर जाळत रास्ता रोको, जालना बंदची हाक

**बीड, दि. २ : मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती पाचव्या दिवशी खालावली. त्यांची प्रकृती खालावल्याने मराठा समाजबांधवांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. सरकार आंदोलनाची दखल घेत नसल्याचा आरोप करत बीड आणि जालना जिल्ह्यात मराठा बांधव आक्रमक झाले असून, विविध ठिकाणी टायर जाळून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जालना जिल्ह्यातील केदारखेडा येथे जालना-जळगाव महामार्गावर मध्यरात्री मराठा समाजबांधवांनी टायर पेटवून सरकारचा निषेध केला. मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीची चिंता असतानाही सरकारकडून त्यांच्या मागण्यांवर ठोस निर्णय घेतला जात नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला. मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मराठा बांधवांनी उद्या (दि.३) जालना जिल्हा बंदची हाक दिली आहे. दरम्यान, त्यांना दंगल घडवायची आहे, असा गंभीर आरोप मनोज जरांगे-पाटील यांनी केला आहे. कोणत्याही परिस्थितीत बारा सप्टेंबरला मुंबईला जाणारच, असा पुनरूच्चार जरांगे-पाटील यांनी केला.**

सरकारने आंदोलनाची तातडीने दखल घेऊन मनोज जरांगे-पाटील यांच्या मागण्यांवर लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, बीडमध्येही मराठा समाजबांधव आक्रमक झाले. बीड-जालना महामार्गावर टायर पेटवून एक मराठा, लाख मराठाच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी काही काळ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. पोलिसांनी मध्यस्थी केल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी (पान ४ वर)

## अनधिकृत होर्डिंग-बॅनरचा ऑनलाईन पंचनामा मनपाकडून सदुसष्ट लाखांच्या दंडात्मक नोटीसा

**धुळे, दि.२ (प्रतिनिधी) : शहरातील सार्वजनिक ठिकाणांचे विद्रुपीकरण करणाऱ्या अनधिकृत होर्डिंग, बॅनर आणि जाहिरातीं विरोधात महानगरपालिकेने आता ऑनलाईन पंचनामा प्रणालीचा अवलंब केला आहे. या प्रणालीद्वारे थेट जागेवरच दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली ही अद्ययावत प्रणाली विकसित करण्यात आली आहे. शहरातील ४६ ठिकाणचा पंचनामा करीत ६७ लाख १५ हजार रूपये वसुलीच्या दंडात्मक नोटीसा जारी केल्या आहेत.**

महापालिका क्षेत्रातील अनधिकृत होर्डिंग-बॅनरची प्रत्यक्ष स्थळपाहणी करून नियुक्त चार क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत ऑनलाइन पंचनामा केला जात आहे. स्थळपाहणीच्या वेळी बॅनरचा लाईव्ह फोटो, त्यावरील मजकूर आणि आवश्यक माहिती ऑनलाइन प्रणालीवर अपलोड केली जाते. त्यानंतर नियमानुसार पंचनामा पूर्ण होई पर्यंतच्या कालावधीचा दंड निश्चित करून संबंधित व्यक्ती किंवा संस्थेला ऑनलाइन दंडात्मक नोटीस बजावली जात आहे. या प्रणालीद्वारे आतापर्यंत शहरातील विविध ठिकाणी असलेल्या ४६ अनधिकृत होर्डिंग-बॅनरचे पंचनामे करण्यात आले आहेत. संबंधितांना एकूण ६७ लाख १५ हजार ६६० रूपयांच्या दंडात्मक नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. दंडात्मक नोटीसा बजावलेल्या व्यक्ती आणि संस्थांकडून महानगरपालिका अधिनियमानुसार दंड वसुलीची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. दरम्यान, ऑनलाइन प्रणालीद्वारे तात्पुरत्या स्वरूपात लावण्यात येणाऱ्या बॅनरच्या परवानगीपोटी आतापर्यंत ८६ हजाराचा महसूल महापालिका प्रशासनास प्राप्त झाला आहे.

सुंदर शहराची जबाबदारी सर्वांची

रस्ते, चौक, विद्युत खांब तसेच सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत जाहिराती आणि बॅनर लाऊन होणारे विद्रुपीकरण रोखण्यासाठी महापालिकेने ही अद्ययावत प्रणाली सुरू केली आहे. त्यामुळे (पान ४ वर)

### वंदे मातरम प्रतिष्ठानतर्फे गणेशोत्सवाचे नियोजन

धुळे, दि.२- देवपूरमधील इंदिरा गार्डन जवळील नामांकित वंदे मातरम प्रतिष्ठानने यंदाही गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी वंदे मातरम प्रतिष्ठान, इंदिरा गार्डन, देवपूर, धुळेच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त मंडप उभारणीच्या कामाचा श्रीफळ वाढवून आज भक्तिभावात व उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला.

वंदे मातरम प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजी. शामकांत बोरसे व अनेक सन्माननीय सभासद व मित्र परिवार मोठ्या उत्साहाने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने मंडप उभारणीच्या कार्याला सुरुवात झाली. वंदे मातरम प्रतिष्ठानच्या माध्यमातून गणेशोत्सव, शिवजयंती, वृक्षलागवड, स्वच्छता कार्य, कष्टकऱ्यांचा गौरव असे विविध विधायक (पान ४ वर)

## चक्करबर्डी परिसरातील बनावट फेरफार नोंदी रद्द करा- मी वडार महाराष्ट्राचा संघटनेने केली मागणी

**धुळे, दि.२- शहराजवळील चक्करबर्डी येथील वडारवाडा या १९८८ पासून अधिकृत गावठान क्षेत्र असलेले गट नं.५१०/अ सिटी सर्व्हे नं. १००२१, १००३२ या शासकीय व दगडखाणी कामगार सोसायटीच्या जमिनीवर भुमाफियांसह त्यांच्या सहकाऱ्यांनी बेकायदेशीर प्लॉटींग, बनावट फेरफार नोंदी केल्या. त्या नोंदी तात्काळ रद्द करण्यात याव्यात. या मागणीचे निवेदन मी वडार महाराष्ट्राचा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा पोलीस अधीक्षक व विभागीय आयुक्तांना दिले आहे.**



निवेदनात नमुद केले आहे की, चक्करबर्डी वडारवाडा ही जागा शासनाने दगडखाणी कामगार सहकारी सोसायटी आणि स्थानिक वडार समाजाच्या कल्याणासाठी व सार्वजनिक वापरासाठी दिलेली आहे. शंभर वर्षांपासून वडार समाजबांधवांचे वास्तव्य त्या ठिकाणी आहे. भुमाफियांनी शासकीय सोसायटीच्या नियमांचे उल्लंघन केले आहे. अप्पर तहसिलदार यांनी भूमाफियाच्या संगनमताने १९८८ च्या गावठाण मंजुरीकडे दुर्लक्ष करून गट नं.५९० अ बाबत बेकायदेशीरपणे परवानगी दिली आहे. संघटनेकडे सदर जमिनीच्या मालकी हक्काचे आणि गावठाण स्वरूपाचे नक्कल अधिकृत शासकीय (पान ४ वर)

### बॅनर लावताना वीजेचा धक्का एकवीस वर्षीय तरुणाचा मृत्यू

धुळे, दि. २ : शहरातील रेल्वे स्टेशनरोड चौकात कार्यक्रमाचे डिजिटल बॅनर लावताना वीजवाहिनीला स्पर्श होऊन २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. चेतन गोपाल मराठे (वय २१, रा. सूर्योदय कॉलनी, वरखेडी रोड, धुळे) असे मृत तरुणाचे नाव आहे. चेतन हा कुटुंबातील ३ विवाहित बहिणींचा एकुलता एक भाऊ होता.

शहरात झालेल्या दुर्दैवी घटनेत मरण पावलेल्या चेतनच्या वडिलांचे दीड वर्षापूर्वी निधन झाले. त्याची आई हातमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होती. कुटुंबाची जबाबदारी चेतनवर होती. तो गणेश डिजिटलचे बॅनर लावण्याचे काम करीत होता. मंगळवारी रात्री रेल्वे स्टेशन रोडवरील चौकात डिजिटल बॅनर लावत असताना वीजवाहिनीवरील तुटलेल्या तारेला स्पर्श झाल्याने (पान ४ वर)

## गुटखा विक्री विरोधात युवासेनेसह महाविद्यालयीन तरूणांची निदर्शने



**धुळे, दि.२- महाविद्यालयांच्या परिसरात उघडपणे चालणाऱ्या अवैध गुटखा व नशायुक्त पदार्थांच्या विक्रीविरोधात आज तरुणाईचा रोष अनावर झाला. महाविद्यालयीन आवारातील ही अवैध विक्री तत्काळ बंद करून तरुणांना व्यसनाधीनतेपासून वाचवावे, या मागणीसाठी युवासेना आणि महाविद्यालयातील युवक-युवतींसह शेकडो विद्यार्थ्यांनी एकत्र येत शाळा व महाविद्यालयांमध्ये तीव्र निदर्शने केली.**

शहर व परिसरातील नामांकित महाविद्यालयांच्या मीटरच्या आत टपऱ्यांवर सर्रास गुटखा, मावा व इतर नशायुक्त पदार्थ उपलब्ध होत आहेत. या नशायुक्त पदार्थांमुळे विद्यार्थी वर्ग व्यसनाच्या गर्तेत अडकत असून त्यांच्या आरोग्याशी खेळ केला जात आहे. वारंवार सूचना देऊनही प्रशासन याकडे डोळेझाक करत असल्याने आज युवासेनेच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी आणि विद्यार्थिनी रस्त्यावर उतरले.

महाविद्यालयांच्या शंभर मीटर परिसरातील सर्व बेकायदेशीर टपऱ्यांवर धाडी टाकून त्या तत्काळ (पान ४ वर)

### आत्महत्यांचे सत्र सुरुच पुरुषाचा मृतदेह आढळला

शिरपूर, दि.२ (का.प्र.):



शिरपूर तालुक्यात तापी नदीत एकापाठोपाठ आत्महत्यांचे प्रकार सुरु असल्याचे चित्र असून गेल्या चार दिवसांत नदीतून तीन जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. दोन सप्टेंबरला शहरातील सुभाष कॉलनी येथील स्वप्निल रामदास बावस्कर (वय ४९) याचा मृतदेह सावळदे येथील नदीपात्रात आढळला.

३१ ऑगस्टला दुपारी तो घरातून निघून गेला होता. त्याचे वडील रामदास (पान ४ वर)

## चोरी झालेल्या सोन्याच्या दागिन्यांची भरपाई नाशिककर ज्वेलर्सच्या प्रयत्नाना मिळाले यश

**धुळे, दि.२- येथील रहिवासी व मुख्याध्यापिका वंदना हिराजी सावंत यांचे बसस्थानकातील गर्दीत दागिने चोरीला गेले होते. परंतु, नाशिककर ज्वेलर्सची तत्परता, विमा संरक्षण आणि धुळे शहर पोलिसांच्या सहकार्यामुळे त्यांना चोरी झालेल्या दागिन्यांची १५ लाख ५० हजार ३४५ रुपयांची नुकसान भरपाई बँक खात्यात जमा झाली आहे.**

वंदना सावंत यांनी धुळे येथील जी. बी. नाशिककर ज्वेलर्स येथून सोन्याचे दागिने खरेदी केले होते. खरेदीदरम्यान नाशिककर ज्वेलर्सचे संचालक अजय नाशिककर यांनी ग्राहकाचे हित लक्षात घेऊन अतिरिक्त कोणतेही शुल्क न घेता ओ लँकर कंपनी (बजाज अलियान्स जनरल इन्शुरन्स) मार्फत मोफत सोन्याचा विमा काढून दिला होता. दि.२७ मे २०२६ रोजी नाशिकला जाण्यासाठी बँक लॉकरमधून दागिने काढून धुळे बसस्थानकावर आल्या असता, गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात महिलांनी त्यांची पर्स कापून दागिने लांबवले.

पोलीस आणि ज्वेलर्सची मदत

या घटनेनंतर वंदना सावंत यांनी धुळे शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल (पान ४ वर)

### जि.मध्यवर्ती सह.बँकेत सरळसेवा नोकर भरती

धुळे, दि.२- धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सरळसेवा नोकर भरती अंतर्गत पात्र उमेदवारांना दि.७, ८ व ९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मौखिम मुलाखत व कागदपत्र पडताळणीसाठी दि.३० व ३१ऑगस्ट २०२६ रोजी त्यांचे वैयक्तिक ई.मेलवर मुलाखत पत्र पाठविण्यात आले आहे.

पात्र उमेदवारांच्या मौखिक मुलाखतीऐवजी सदर मुलाखत पत्रात कागदपत्र पडताळणीबाबत नमुद करण्यात आलेल्या महत्वाच्या सुचनांची तसेच उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेत मिळालेले गुण व कागदपत्र पडताळणीत मिळणारे गुण यांची एकत्रित बेरीज करून गुणवत्तेनुसार (पान ४ वर)

## महापालिकेची चार क्षेत्रीय कार्यालये सुरू विविध सेवा सुलभ रीतीने उपलब्ध होणार

**धुळे, दि. २ (प्रतिनिधी) : नागरिकांची गैरसोय दूर करून महापालिकेच्या विविध सेवा अधिक सुलभ आणि जलद उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेने चार क्षेत्रीय कार्यालय सुरू केली आहेत. आपल्या प्रभागाशी संबंधित कामांसाठी नागरिकांनी मुख्यालयात जाण्याऐवजी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.**

महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १, २, ४, ५, ६ व ७ साठी क्षेत्रीय कार्यालय क्रमांक एक कार्यरत करण्यात आले असून त्याचे कार्यालय नवयुग जलकुंभ, जवळ, देवपूर, धुळे येथे आहे. प्रभाग क्रमांक ३, १२, १३ व १५ साठी क्षेत्रीय कार्यालय क्रमांक दोन असून ते मनपा शाळा क्रमांक २, सुभाष पुतळा, जुने धुळे येथे आहे. प्रभाग क्रमांक ११, १४, १६, (पान ४ वर)

## दोन कोटी सात लाख बोगस मतदारांच्या मतदानावर महायुती सत्तेत : अनिल गोटे



**धुळे, दि. २ (प्रतिनिधी) : लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात सत्तारूढ भाजपला खासदारांची दहाअंकी संख्या गाठता आली नाही. मात्र, त्यानंतर अवघ्या चार महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे तब्बल १३२ आमदार निवडून आले. या विरोधाभास यामागील कारण आता निवडणूक आयोगाच्या सुरू असलेल्या पुनरिक्षण प्रक्रियेतून स्पष्ट होत असल्याचा दावा शिवसेना नेते तथा माजी आमदार अनिल अण्णा गोटे यांनी केला आहे. आयोगाच्या सुरू असलेल्या तपासणीत महाराष्ट्रात २ कोटी ७ लाख बोगस मतदारांची नोंदणी झाली होती, असा दावा गोटे यांनी केला आहे. त्यामुळे निवडून आलेले महायुतीचे सरकार हे लोकप्रिय मतांवर नव्हे, तर बोगस मतांच्या आधारे सत्तेवर आलेले सरकार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

धुळे शहरात सत्तारूढ पक्षाचे तब्बल ४५ हजार (पान ४ वर)

### घर खाली करण्यासाठी एक लाखाची खंडणीची मागणी

धुळे, दि.२- देवपूर परिसरातील वृद्धेचे घर खाली करण्यासाठी एक लाख रुपयांची खंडणी मागत ठार मारण्याची धमकी दिली, याप्रकरणी देवपुर पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

कमलाबाई नामदेव पाटील (६५, रा. नावरा-नावरी, धुळे) यांच्या मालकीचे देवपूर एकता नगर बिलाडी रोड येथे घर आहे. त्यांनी भाडेकरूंना घर खाली करण्यास सांगितले, त्यावरून संशयित संगीता नाना कढरे, ओम कढरे, (दोन्ही रा द्वारका नगर, देवपूर), विलास शिंदे (रा. आरती कॉलनी, देवपुर), (पान ४ वर)

## जि.परिषद समोर शालेय पोषण आहार कामगारांचे आंदोलन; थकीत मानधन किमान वेतनाची मागणी

**धुळे, दि.२- जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देणाऱ्या शालेय पोषण आहार कामगारांचे थकीत मानधन तत्काळ अदा करावे, या प्रमुख मागणीसाठी स्वयंपाकी मदतनीस कामगार संघटना (सीआयटीयू संलग्न, धुळे-नंदुरबार) आक्रमक झाली आहे. संघटनेच्या शिष्टमंडळाने १ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून कामगारांच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधले.**

धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांत एकूण ५,३०७ शालेय पोषण आहार कामगार कार्यरत असून यामध्ये विधवा, परितक्त्या, घटस्फोटित, दलित, ओबीसी, अल्पसंख्याक आणि अत्यंत गरीब कुटुंबांतील महिला व पुरुषांचा समावेश आहे. हे कामगार रोज सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत (६ तास) सतत काम करतात. यामध्ये पाणी आणणे, शाळा परिसर स्वच्छ ठेवणे, झाडांना पाणी घालणे, शौचालय व बाथरूम साफ करणे, तांदूळ शिजवणे, विद्यार्थ्यांना ओळीत बसवून जेवण वाढणे आणि भांडी धुणे अशी विविध कामे त्यांच्याकडून करून घेतली जातात. एवढे कष्ट करूनही त्यांना केवळ ८३ रुपये रोज म्हणजेच महिन्याला अवघे २५०० रुपये मानधन दिले जाते. हे तुटपुंजे मानधनही वेळेवर मिळत नसल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून प्रशासनाविरोधात तीव्र असंतोष पसरला आहे.

या पार्श्वभूमीवर संघटनेने निवेदनाद्वारे प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये ५ जुलै २०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत ठरल्यानुसार (पान ४ वर)

### दत्त प्रभुंच्या मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव

सोनगीर दि.२(प्रतिनिधी)- येथील दोंडाईचा रोडवर असलेल्या भगवान श्री दत्त प्रभुंच्या मंदिरात सालाबादप्रमाणे यंदाही भगवान श्री कृष्ण जन्मोत्सव व गोकुळ अष्टमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हा जन्मोत्सव सोहळा शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ह.भ.प. भागवताचार्य प्रतिभाताई पाटील (सोनगीरकर) यांचे रात्री नऊ ते ११ या वेळेत जाहीर कीर्तन होणार असून, त्यांना (पान ४ वर)

### राधाकृष्ण मंदिरात जन्मोत्सव

धुळे, दि.२- शहरातील ग.नं.२ मधील श्री राधाकृष्ण मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन मुलचंद सदाराम गिंदोडीया व परिवारच्यावतीने दि.४ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. जन्मोत्सव सोहळ्या प्रसंगी मालेगाव येथील कृष्णा दायमा यांच्या सुमधूर वाणीतून भजन संध्या कार्यक्रम रात्री ८ ते १२.३० वाजेच्या कालावधीत होणार आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,41,250 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,35,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## शिरपूर पीपल्स बँकेची सभा उत्साहात संपन्न व्यवसाय एक हजार कोटींच्या पुढे नेणार- भंडारी

**शिरपूर, दि.२- : शिरपूर पीपल्स को-ऑप बँक लि. शिरपूर या बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा ३० ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता एस.एम. पटेल ऑडोटोरियम हॉल, करवंद नाका शिरपूर येथे बँकेचे अध्यक्ष योगेश भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.**

सभेच्या सुरुवातीला गेल्या आर्थिक वर्षात दिवंगत राष्ट्रीय नेते, समाजसेवक, सभासद, खातेदार, शहीद जवान, हितचिंतक व बँकेचे जेष्ठ सभासद असे सर्व दिवंगत यांना श्रद्धांजली वाहून सभेचे कामकाज सुरु करण्यात आले. यावेळी प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणी चेअरमन भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई



पटेल, बँक माजी अध्यक्ष राजगोपाल भंडारी, अध्यक्ष योगेश भंडारी, उपाध्यक्ष श्रेणिक जैन, कमलकिशोर भंडारी, कैलासचंद्र अग्रवाल, गोपाल भंडारी, बँकेचे संचालक दिलीप पटेल, बाबुलाल माळी, मोतिलाल माळी, संजय चौधरी, डॉ. संजय सुराणा, कमलेश अग्रवाल, बिपीन तेले, जितेंद्र पोतदार, भूपेश अग्रवाल, डॉ. वैशाली पाटील, कल्पना राजपूत, गणेश साळुंके, सीए अतुल पटवारी, डॉ. लक्ष्मीकांत शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी बी.जे.पाटील, महाव्यवस्थापक आनंद पाठक, व्यवस्थापक नरेंद्र माळी, व्यवस्थापक योगेंद्र पाटील, अधिकारी, कर्मचारी तसेच बँकेचे सभासद व विद्यार्थी उपस्थित होते.

सभेला संबोधित करताना बँकेचे चेअरमन योगेश भंडारी यांनी बँकेच्या वाटचालीचा आढावा सादर करत आगामी आर्थिक वर्षासाठी महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे जाहीर केली. २०२६-२७ या आर्थिक (पान २ वर)

### शेतकरी परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन

धुळे, दि.२- देवपूर गोंदूर रोड परिसरातील सौभाग्य मंगल कार्यालय येथे धुळे जिल्हा शेतकरी संघटनेच्यावतीने तंत्रज्ञान सप्ताह शेतकरी परिसंवाद दि.४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या परिसंवादाप्रसंगी शेतकरी संघटना महाराष्ट्रचे अध्यक्ष ललित बहाळे, अे.आय.के.सी.सी. नवी दिल्ली चे जनरल सेक्रेटरी गुणवंत पाटील हंगरगेकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. युगात्मा शरद जोशी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात येत आहे. कापूस मका उत्पादन वाढीचे तंत्र यावर जैन इरिगेशन (पान ४ वर)

## बोरकुंड औषध निर्माणशास्त्र विद्या.त ड्रग इन्स्पेक्टर पदावर चर्चासत्र संपन्न

**धुळे, -(प्रतिनिधी)- बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानच्या कॉलेज ऑफ फार्मसी येथे विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने ड्रग इन्स्पेक्टर पदावरील संधी व तयारी या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले. महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या ऑनलाईन चर्चासत्रात, विविध मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत विविध शंकाचे निरसन केले.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे होते, तर यावेळी संस्थेच्या सचिव शालिनीताई भदाणे, प्राचार्य डॉ. आर.ए. अहिरराव आदी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक, पुणे येथील फार्मालाइफ अकॅडमीचे संचालक प्रा.सुनिल बाकलीवाल पुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. सुनील बाकलीवाल यांनी ड्रग इन्स्पेक्टरची भूमिका व जबाबदाऱ्या, पात्रता, भरती प्रक्रिया, स्पर्धा परीक्षेची तयारी, आवश्यक विषयांचे ज्ञान तसेच (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## इमारती उदंड जाहल्या तो ते विकास निघोनी गेला

पूर्वी धुळे जिल्हा दहा तालुक्यांचा होता. त्यात नवापूर, नंदुरबार, अक्कलकुवा, तळोदे,शहादे,अक्राणी अर्थात धडगाव हे सहा तालुके आदिवासी होते. धुळे ,साक्री, शिंदखेडा शिरपूर हे चार तालुके बिगर आदिवासी असले तरी पस्तीस टक्के लोकसंख्या याही तालुक्यांमध्ये आदिवासी होती. या सर्व दहा तालुक्यांच्या धुळे जिल्ह्याचे मुख्यालय म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय धुळे शहरातील प्रशासकीय संकुलात होते. विस्ताराने मोठ्या असलेल्या या जिल्ह्याचा कारभार त्या कचेऱ्यांमधून व्यवस्थित चालत असे. कालांतराने १९९९ मध्ये नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती झाली. तिथे जिल्हाधिकारी कार्यालय, सिविल हॉस्पिटल, जिल्हा न्यायालय, इत्यादी कार्यालयांची देखील निर्मिती झाली. चार तालुक्यांच्या छोट्याशा धुळे जिल्ह्यासाठी प्रशासकीय संकुलातील इमारती पुरेशा होत्या. मात्र असे असले तरी प्रिझन गार्डनच्या जागेत नवे प्रशासकीय संकुल निर्माण करण्यात आले. त्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आले. याशिवाय सार्वजनिक बांधकाम भवन, सामाजिक न्याय भवन, सिंचन भवन, वनभवन आणि जिल्हा रुग्णालय आदी नव्या इमारती बांधण्यात आल्या. आकाराने जिल्हा छोटा असला तरी प्रत्येक विभागाच्या इमारतींसाठी प्रचंड निधी खर्च करण्यात आलेला आहे. प्रशासकीय संकुलात सर्व विभागांचे एकत्रीकरण करण्यात येईल असे सांगण्यात आले होते पण तसे काही घडले नाही. नव्या इमारतीत फक्त महसूल खाते आणि माहिती खाते असे दोनच विभाग आहेत. ग्राहक न्यायालयाची इमारत नव्याने बांधण्यात आलेली आहे. मात्र सतत इमारती आणि रस्त्यांच्या निर्मितीवर प्रेम करणा–या घटकांची सांगड असल्यामुळे ४७ कोटी रुपये खर्च करून नवीन जिल्हाधिकारी कार्यालय उभारण्याचा घाट घालण्यात आलेला आहे.

खरोखरच साधारणपणे अर्धा अब्ज रुपये खर्चाची नवी जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत गरजेची होती काय या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी मिळते. खूप कामाचा व्याप वाढला, इमारती कमी पडतात, कर्मचारी वर्ग वाढला, त्यांना बसण्यासाठी जागा अपुरी पडते असे काहीही नाही. तरीही नवी इमारत बांधण्याचा चंग शासनाने बांधला आहे. यातून एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो आणि तो म्हणजे इमारती कितीही बांधल्या आणि कितीही चकाचक असल्या तरी त्यात बसून काम करणारा अधिकारी आणि कर्मचारी वर्ग सर्वसामान्य माणसाच्या हिताचे किती निर्णय घेतो किंवा घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करतो. या प्रश्नाचे उत्तर देखील नकारार्थी येते. सर्वसामान्य माणसाचे नष्टचर्य काही संपत नाही. मग या इमारतींचा काय उपयोग? महापालिकेच्या क्षेत्रातही अशा बऱ्याच इमारती उभारण्याचे काम सुरू असते. रस्त्यांची कामे तर सतत चालू असतात. पाच वर्षाच्या कालखंडात नगरसेवकाची मुदत संपण्याच्या आत एकच रस्ता तीन वेळा तयार करण्याचे टेंडर काढण्याचे चमत्कार याच शहरात होतात. तसेच चमत्कार इतर शहरातही होत असतील. कारण बाकीच्या लोककल्याणकारी कामापेक्षा बांधकामे हेच लोक कल्याणकारी काम आहे. असे गृहीत धरून काही ना काही निमित्ताने बांधकामे काढली जातात ही वस्तुस्थिती आहे. शिरपूर तालुक्यात आदिवासी भागामध्ये दोन गावांना जोडणारा पूल अस्तित्वात नसताना त्यावर खर्च करण्यात आला आणि सामुदायिक उखळ पांढरे करण्यात आले. त्याची चौकशी करण्याचे थातूरमातूर निर्णय घेण्यात आले. पुढे काहीच झाले नाही.

जिल्हा परिषदेची नवी प्रशासकीय इमारत अनेक वर्षांपूर्वी बांधण्यात आली होती. वसंत दादा पाटील मुख्यमंत्री असण्याचा तो काळ होता. त्यांना या इमारतीचे उद्घाटन करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. ते आले आणि इमारतीचे बांधकाम बघून त्यांनी उघड उघड परसेंटेज संप्रदाय कमी करावा असे जाहीरपणे आणि रोखठोकपणे सांगितले होते. त्यांनी असे का सांगितले याबद्दलचे विश्लेषण करण्याची आवश्यकता नाही. त म्हणजे तपेले एवढे तरी आता बहुतेकांना कळते. चार तालुक्यांचा जिल्हा असूनही नंदुरबार आणि धुळे हे दोन्ही जिल्हे दरडोई उत्पन्नात सगळ्यात शेवटचे आहेत. पैशांनी बुजले जावेत एवढा पैसा विकास कामांवर स्वातंत्र्यानंतर खर्च करण्यात आला. तरीही विकास का झाला नाही, सामान्य माणसाचे जीवन सुसह्य का झाले नाही असा प्रश्न आहे. मग या इमारतींचा आणि त्यात बसणाऱ्या नोकरशहांचा तसेच सर्वसामान्य माणसासाठी निर्णय घेणाऱ्या लोकप्रतिनिधींचा काय उपयोग? जळगावच्या बाहेरून जाणे सोयीचे व्हावे म्हणून बायपास काढण्यात आला. धुमधडाक्यात त्याचे उदघाटन झाले. परंतु पहिल्याच पावसात हायवे वरील पूल कोसळला आणि वाहतूक बंद पडली. आता शहरातील जुन्या रस्त्यावर जड वाहतुकीसह पूरती कोंडी झालेली आहे. या कामावर देखील करोडो रुपये खर्च झालेले आहेत . त्यावर कोणी बोलत नाही. इमारतीवर इमारती बांधण्यात येतील, चकचकाट रस्ते उभारले जातील. पण माणूस आहे तिथेच राहणार असेल तर त्या सर्व सोयी सुविधांचा काय उपयोग. याबद्दल शासकांनी विचार करणे आवश्यक आहे.

धुळे जिल्ह्याचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते .जिल्ह्याचा आकार मोठा असताना उपलब्ध प्रशासकीय यंत्रणेतून कारभार चालू शकला, तर जिल्ह्याचा आकार कमी झाल्यानंतर प्रशासकीय इमारतींची संख्या मात्र वाढतच का जाते असा कळीचा प्रश्न उपस्थित होतो.अशा उफराट्या विकासाचे गुणगान किंवा समर्थन करणारे फार आहेत.ते मुळीच थकत नाहीत.त्यांचे यात काहीच नुकसान होत नाही झाला तर फायदाच होतो.अशा स्तुती पाठकांची इथे कमतरता नाही.प्रश्न स्तुती पाठकांचा नाही ते सर्व ठिकाणी मौजूद आहेत.खुशमस्करे आणि योजनाबध्द रीतीने असतील तेवढे खिसे भरणारे चेकाळतात हा महत्वाचा मुद्दा आहे. जी व्यवस्था आहे ती कमी पडू लागली आहे काय या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी मिळते. तथापि कोणी निंदा कोणी वंदा आम्हा स्वहिताचा धंदा अशी परिस्थिती असल्यामुळे प्रशासकीय जागा कमी पडू लागल्या का कर्मचारी अचानक प्रचंड वाढले का,नागरिकांची कामे इतकी वाढली की जुन्या इमारती अपुऱ्या पडल्या का असे प्रश्न कुणालाही पडत नाहीत.वास्तव परिस्थितीचा विचार करू जाता हा केवळ एका इमारतीचा प्रश्न नसून शासनाच्या आणि तथाकथित लोकप्रतिनिधींच्या विकासाच्या दृष्टीचा प्रश्न आहे.गरज माणसांची आहे की इमारतींची आहे या गोष्टीचा प्रश्न आहे. कोटी रुपये म्हणजे किरकोळ रक्कम नाही. एवढ्या पैशात कितीतरी गावांना शुध्द पाणीपुरवठा होऊ शकतो. ग्रामीण आरोग्यव्यवस्था मजबूत करता येऊ शकते. शाळांची दुरुस्ती करता येऊ शकते. आदिवासी भागातील रस्ते, पूल आणि मूलभूत सुविधा उभ्या करता येऊ शकतात. रोजगारनिर्मितीसाठी योजना राबवता येऊ शकतात.मग त्या तुलनेत आधीच उपलब्ध असलेल्या प्रशासकीय सुविधांमध्ये नव्या इमारती उभारणे कितपत प्राधान्याचे आहे यावर दुर्दैवाने कोणीही विचार करायला तयार नाही. कारण अनेकांना विकासातील मलई खुणावत असते. त्यासाठी त्यांच्या डोक्यात सतत योजना तयार होत असतात. त्यातूनच निरर्थक प्रकल्प उभे राहतात.म्हणूनच प्रश्न इमारत बांधण्याला विरोध करण्याचा नसून गरज नसताना बांधकामे काढण्याचा आहे. सरकारी बांधकामामध्ये पैसा खर्च होतो आणि त्यातून कामाचे मोजमापही सहज करता येते.इतक्या कोटींची इमारत, इतक्या चौरस फुटांचे बांधकाम, इतके मजले, इतके रस्ते.असे काही तरी सुरू असते आणि त्यातून खिशांचे आकारही वाढत जातात. पण एखाद्या गरीब कुटुंबाचे जीवन किती सुधारले, एखाद्या शेतकऱ्याची अडचण किती कमी झाली, एखाद्या आदिवासी विद्यार्थ्याला शिक्षणाची संधी किती मिळाली, एखाद्या रुग्णाला वेळेवर उपचार मिळाले की नाही, एखाद्या नागरिकाचे सरकारी कार्यालयातील काम किती सहज झाले याचे मोजमाप करणे कठीण आहे.कदाचित म्हणूनच बांधकामे सोपी आणि माणूस कठीण झाल्याचे दिसते.

वसंतराव दादा पाटील मुख्यमंत्री असताना जिल्हा परिषदेच्या इमारतीचे उदघाटन करताना त्यांनी जे काही सांगितले होते ते आजही ताजे आहे. जी सिस्टीम तथाकथित धर्म भास्कराच्या काळात होती ती आजही कायम असून, बरबाद ए गुलिस्तॉ करने को बस एकही उल्लू काफी था, यहा हर शाख पर उल्लू बैठा है, अंजाम ए गुलिस्तॉ क्या होगा अशीच परिस्थिती आहे . या प्रवृत्तीचे लोक केवळ जिल्हाच नव्हे तर देश बरबाद करण्यासाठी तत्पर आहेत असे दुर्दैवाने म्हणणे भाग आहे.सरकारी बांधकाम म्हणजे केवळ विकास नसतो तर त्यात अनेकांच्या आर्थिक हितसंबंधांची साखळी तयार झालेली असते. पूर्वी अशा प्रकारचे हितसंबंध जोपासणारे लोक नव्हते. परिणामी निर्मितीचे काम अतिशय चोख आणि मजबूत होत असे. आता तसे अपवादानेच होते.जर एखादे बांधकाम किंवा इमारत खरोखर आवश्यक असेल, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. पण इमारत आवश्यक आहे की निधी खर्च करण्याची संधी आवश्यक आहे, हा फरक तपासला पाहिजे.धुळे असो किंवा इतर शहरे असोत, (पान ३ वरून)



## क्लस्टरस्तरीय विज्ञान-गणित प्रदर्शनात एकलव्य विद्यालयाची तिहेरी कामगिरी

**नंदुरबार, २ (प्रतिनिधी)- नाशिक जिल्ह्यातील एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, पिंपरी सद्रो (ता. इगतपुरी) येथे नुकत्याच पार पडलेल्या २०२६-२७ च्या क्लस्टरस्तरीय विज्ञान व गणित प्रदर्शनात एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, ढोंगसागाळी (जि. नंदुरबार) च्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून शाळेचे तीन्ही प्रकल्पांची राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी निवड झाली असल्याची माहिती एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, ढोंगसागाळीचे प्राचार्य अनिल मंगळे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.**

या प्रदर्शनात ज्युनिअर गटात दिया सायसिंग पाडवी आणि रियान निलेश वसावे यांनी सादर केलेल्या कृषीतील स्वयंचलन या प्रकल्पाने प्रथम क्रमांक पटकावला. या कार्यरत मॉडेलमध्ये सौरऊर्जा, स्वयंचलित सिंचन, पाण्याची बचत, सेन्सर-आधारित सूचना आणि आधुनिक पीक संरक्षण यांसारख्या संकल्पनांचा एकत्रित वापर दाखविण्यात आला होता.

गणित विभागात सुजिता अरविंद गावित आणि नूतन भरत पावरा यांच्या त्रिकोणमिती उद्यान या प्रकल्पाने द्वितीय क्रमांक मिळवला. त्रिकोणमितीच्या किचकट संकल्पना प्रत्यक्ष दैनंदिन जीवनातील उदाहरणांशी जोडून अत्यंत सोप्या व रंजक पद्धतीने मांडण्यात आला होता. तर सीनियर गटात अरमान राजन वळवी आणि वैभव रवींद्र पाडवी यांच्या शाश्वत ग्राम या प्रकल्पाने सहावा क्रमांक पटकावला. शाश्वत विकास, संसाधनांचा समतोल वापर आणि पर्यावरणपूरक ग्रामरचना यावर हा प्रकल्प आधारित होता.

या यशाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कृषीतील स्वयंचलन, त्रिकोणमिती उद्यान आणि शाश्वत ग्राम या तिन्ही प्रकल्पांची राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक श्रीमती शिवानी दीक्षित, वडमारे सुबोध जिजा, भुरू चौधरी आणि विशाल कुमार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य श्री. मंगळे यांनी यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## चौघांनी शेतात घुसून पिकांचे केले नुकसान

नंदुरबार, दि.२(प्रतिनिधी)- तालुक्यातील नळवे गाव शिवारातील शेतांमध्ये घुसून चौघांनी उभ्या पिकांचे नुकसान केल्याची घटना घडली आहे. या घटनेत पपई, कपाशी आणि मिरची या पिकांची झाडे उपटून फेकून देण्यात आल्याने शेतकऱ्यांचे सुमारे २ लाख ७८ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

३१ ऑगस्टच्या रात्री ही घटना घडली. याप्रकरणी वासुदेव हरी चौधरी यांनी फिर्याद दिली असून, चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलीप सेंगा पवार, सुभाष टिला पाटील, श्रीपद नथू पटेल, रामकृष्ण हरी चौधरी आणि मुकेश जयंतीलाल चौधरी आदी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन उभ्या पिकांचे नुकसान करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पपईसोबतच मिरची आणि कपाशीच्या पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

## विद्यार्थ्यांना तारांगणाचा अनुभव

शहादा,दि.१- तालुक्यातील पाडळदे येथील वल्लभ विद्या मंदिर व आदर्श प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची थ्री डी इफेक्टद्वारे तारांगण सुर्यमाला दर्शन हा कार्यक्रम दाखवण्यात आला. हा कार्यक्रम पोलाद स्टील कंपनी जालना व राज पाईप शहादा संचालक इस्माईल राजा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासू वृत्ती निर्माण व्हावी. त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने तारांगण व सुर्य माला दर्शन कार्यक्रम घेण्यात आला. तारांगण सफरीचा थरारक अनुभव घेतला.

## प्रकाश में आज अनोखी अदा




जितेंद्र रेखा, विनोद खन्ना

वर्षात बँकेने १ हजार कोटींचा व्यवसाय केल्याची बाब आनंदाने सादर केली. बँकेच्या अधिक प्रगती साठी संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रयतक्रांसह सभासद, ठेवीदार, ग्राहक व हितचिंतकांचे सक्रिय सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिरपूर पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील बँकेच्या उल्लेखनीय प्रगतीचा आढावा घेण्यात आला. बँके मार्फत सभासदांच्या हितासाठी १० टक्के लाभांश जाहीर करण्यात येऊन, यासाठी सुमारे रुपये १.३९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

आर्थिक स्थितीत भरीव सुधारणा

३१मार्च २०२६ अखेर बँकेचे एकूण कार्यकारी भांडवल रुपये ६९१.१२ कोटींवर पोहोचले आहे. बँकेच्या ठेवी रुपये ५७६.८२ कोटी, तर कर्जवाटप रुपये ३३२.२१ कोटी इतके झाले आहे. बँकेची गुंतवणूक रुपये २७२.८८ कोटी, भागभांडवल रुपये १५.०५ कोटी आणि राखीव निधी रुपये ९२.६९ कोटी इतका आहे.

बँकेने आर्थिक शिस्त व मालमत्ता गुणवत्तेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या निकषांपेक्षा अधिक म्हणजे १९.८९ टक्के सीआरएआर राखण्यात बँकेला यश आले आहे. तसेच सकल एनपीए ४.२० टक्क्यांवरून २.६८ टक्क्यांवर, तर निव्वळ एनपीए १.८२ टक्क्यांवरून ०.७६ टक्क्यांवर आणण्यात यश मिळाले आहे. त्यामुळे बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम झाल्याचे सभेत नमूद करण्यात आले.

आधुनिक तंत्रज्ञानावर भर

बँकेने बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून ग्राहकांना अधिक जलद, सुरक्षित व सोयीस्कर सेवा देण्यावर भर दिला आहे. डिजिटल बँकिंग, कोअर बँकिंग प्रणाली अधिक सक्षम करणे, डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणे आणि सायबर सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## शिरपूर पीपल्स बँकेची सभा उत्साहात संपन्न

बँकेच्या सर्व एटीएम सेवा आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्याचे काम करण्यात आले असून, नवीन यंत्रणा बसविण्याचे कामही प्रगतिपथावर आहे. तसेच आरटीजीएस, एनईएफटी सुविधा, इंटरनेट बँकिंग आणि डिजिटल व्यवहारांचा विस्तार करण्यावर आगामी काळात विशेष भर दिला जाणार आहे.

आ.पटेलांच्या दूरदृष्टीतून बँकेचे अधुनिकीकरण

बँकेचे संस्थापक अध्यक्ष अमरिशभाई पटेल यांनी स्थापनेपासून बदलत्या आर्थिक व तांत्रिक परिस्थितीचा स्वीकार करून बँकेला आधुनिकतेकडे नेण्यावर भर दिला. त्यांच्या मार्गदर्शनातून ग्राहकांना सुरक्षित व तंत्रज्ञानाधारित सेवा उपलब्ध करून देणे, बँकेच्या कार्यक्षमतेत वाढ करणे आणि ग्राहककेंद्री दृष्टिकोन विकसित करण्याचे काम सुरू असल्याचे सभेत स्पष्ट करण्यात आले.

ठेवी, कर्जवाटप, गुंतवणूक, नफा आणि मालमत्ता गुणवत्तेच्या बाबतीत बँकेने समाधानकारक प्रगती केली असून, आगामी काळात अधिक सक्षम, आधुनिक, स्पर्धात्मक व ग्राहककेंद्रित बँक म्हणून विकसित होण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

सभासदांच्या पाल्यांना शैक्षणिक प्रोत्साहन

बँकेने आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक बांधिलकीही जपली आहे. सभासदांच्या पाल्यांमध्ये शिक्षणाविषयी प्रेरणा निर्माण व्हावी आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कामगिरीला प्रोत्साहन मिळावे यासाठी गुणवंत विद्यार्थी पुरस्कार योजना राबविण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये १० वी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या ३३ विद्यार्थ्यांना रुपये ६५,३००, तर १२ वी परीक्षेतील ४ गुणवंत विद्यार्थ्यांना रुपये १५,८०० अशी एकूण ३७ विद्यार्थ्यांना रुपये ८१,१०० इतकी शैक्षणिक पारितोषिके देण्यात आली.

सभासद कल्याणासाठी आर्थिक मदत

सभासद कल्याण योजनेंतर्गत विविध आजारांच्या उपचारासाठी आर्थिक मदतही देण्यात आली. ऑर्थोप्लास्टी सहाय्य, मोतीबिंदू शस्त्रक्रिया सहाय्य, मृत्यू निधी सहाय्य आणि कन्यारतक प्राप्ती अशा विविध योजनांतर्गत ३६ सभासदांना एकूण रुपये १.७६ लाखांची मदत देण्यात आली.

शैक्षणिक पुरस्कार आणि सभासद कल्याणाच्या विविध योजनांसह एकूण ७३ लाभार्थ्यांना रुपये २.५७ लाखांची मदत, पारितोषिके देण्यात आली.

सभासदांच्या हिताला प्राधान्य

बँकेच्या नफ्याचा उपयोग केवळ व्यवसाय वृद्धीसाठी न करता सभासदांच्या हितासाठी आणि सामाजिक उपक्रमांसाठी करण्याची भूमिका संचालक मंडळाने स्पष्ट केली. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मिळालेल्या नफ्यातून सहकार कायदा, नियम व बँकेच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन विविध निधींमध्ये तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सामाजिक बांधिलकीची परंपरा कायम

बँकेने आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक उत्तरदायित्वाची परंपराही जपली आहे. शिक्षण, सभासद कल्याण आणि समाजोपयोगी उपक्रमांना प्रोत्साहन देत बँकेने सहकाराच्या मूल्यांना बळकटी दिली आहे.

आगामी काळात व्यवसाय विस्तार, ग्राहक सेवा गुणवत्तेत वाढ, डिजिटल बँकिंगचा प्रसार, जोखीम व्यवस्थापन, नियामक अनुपालन आणि सायबर सुरक्षा यावर अधिक भर देण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून बँकेला अधिक सक्षम, सुरक्षित आणि ग्राहकाभिमुख बनविण्याचा निर्धार सभेत व्यक्त करण्यात आला.

प्रास्ताविक सीईओ बी.जे. पाटील, अहवाल वाचन महाव्यवस्थापक आनंद पाठक, सूत्रसंचालन व्यवस्थापक नरेंद्र माळी यांनी तर आभार गणेश साळुंके यांनी मानले.

### शब्दकोडे क्रमांक : २४४६

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ■ | ५ | ५अ | ■ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | | १० | |
| | ■ | ११ | | | ■ | १२ | | | ■ | | ■ |
| ■ | १३ | ■ | | ■ | १४ | | | ■ | १५ | | १६ |
| १७ | | १८ | ■ | १९ | | ■ | २० | २१ | | ■ | |
| ■ | २२ | | २३ | ■ | २४ | | ■ | | ■ | २५ | ■ |
| २६ | ■ | २७ | | २८ | | ■ | २९ | | | | ३० |
| ३१ | ३२ | | ■ | | ■ | ३३ | | | ■ | ३४ | |
| ३५ | | ■ | ३६ | ■ | ३७ | | | ■ | ३८ | | ■ |
| ■ | ३९ | | | | ■ | | ■ | ४० | | ■ | ४१ |
| ४२ | | ■ | | ■ | ४३ | | ४४ | | ■ | ४५ | |
| | ■ | ४६ | | | | ■ | ४७ | | | ■ | |

**आडवे शब्द** : १.मुलीचे लग्नापूर्वीचे किंवा आई-वडिलांचे घर ३.मिरचीचा स्वाद ५.जो जुना नाही असा,नवीन ७.शिरा बनवण्यासाठी लागणार मुख्य घटक ८.संकट काळात मिळणारा निवारा किंवा आश्रय ९.देव्हाऱ्यात सुवास पसरवण्यासाठी लावली जाणारी काडी ११.तोरा १२.झाडांनी वेढलेला मोठा विस्तीर्ण प्रदेश, जंगल १४.एखादी गोष्ट वारंवार करून केलेली प्रॅक्टिस १५.सेवा करणारा सेवक किंवा नोकर १७.चहा, कॉफी किंवा व्यसनाची येणारी तीव्र इच्छा १९.सोबत किंवा बरोबर असणे २०.द्रव पदार्थ मोजण्याचे एक परिमाण २२.मध्य रेल्वेतील एक स्थानक वा कळवणे या अर्थी २४. आनंद,गंमत किंवा करमणूक २७.महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील एक प्रसिद्ध ऐतिहासिक शहर २९.एखाद्या गोष्टीची भासणारी टंचाई किंवा उणीव ३१.मध्ये न थांबता एकापाठोपाठ एक येणारे ३३.प्रकाश किंवा तेजाचा झोत वा अंश ३४.नवरा मुलगा ३५.नावासमोर लावले जाणारे एक आदरयुक्त पद ३७.अंतर कमी असणे, समीप ३८.पंथ ३९.डोंगराळ भागात मिळणारे काळे गोड-आंबट रानमेव्याचे फळ ४०.धावण्याची क्रिया किंवा वेगाची हालचाल ४२.महान, श्रेष्ठ किंवा मोठी व्यक्ती ४३.उन्हाळ्यात प्यायले जाणारे लिंबू-साखरेचे थंड पेय ४५.६ आणि ८ यांच्या मधील संख्या ४६.फोडणीत वापरली जाणारी सुवासिक पाने ४७.जंगलात राहणारे किंवा अनियंत्रित, हिंस्र **उभे शब्द** : १.संगीतातलं एक राग २.दुसऱ्याचे चांगले पाहून वाटणारा मत्सर किंवा असूया ३.दुसऱ्या क्रमांकाच्या नंतर येणारा अनुक्रम ४. जो खोटा नाही असा,सत्य किंवा प्रामाणिक ५.तुरळक,विरळ ५अ.दिन ६.विजेचा दिवा किंवा प्रकाश देणारे साधन ८.नियोजन ९.राजस्थानातील एक पर्वत रांग १०अंड्याच्या आतील पिवळा भाग १२.राअ-उलट लिहा १३.बोर्ड,सूचना दर्शवणारा फळा १४.होकार १५.दोन आणि दोन मिळून तयार होणारी संख्या १६.सुट्टी १८.फळांची केलेली शेती २१.रायगडावरील प्रसिद्ध कडा २३.पवन २५.लाकूड कापण्याचे साधन २६.पतीचे वडील २८.बुद्धी २९.सरोज ३०.धातूचा बारीक तंतू ३२.त्वरेने ३३.रुचकर ३६सोबती ३८.आगीचा उठलेला लोट ४०.नाश

### शब्दकोडे क्रमांक : २४४५ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पं | त | प्र | धा | न | ■ | खां | दा | ■ | व | ■ | का |
| ग | वा | ■ | म | त | ल | ब | ■ | सा | ■ | क | ला |
| त | ■ | क्यू | ■ | म | त | ■ | पो | ख | र | ण | ■ |
| ■ | गो | ■ | अ | स्त | ■ | पा | क | ळी | ■ | ख | त |
| पा | ड | स | ■ | क | रं | ग | ळी | ■ | ता | र | पा |
| म | ■ | ला | भ | ■ | गा | ल | ■ | ख | री | ■ | स |
| र | क | म | ■ | चो | री | ■ | ते | ■ | ख | ल | ■ |
| ■ | द | ■ | ख | च | ■ | सा | ल | सा | ■ | बा | द |
| भ | र | पू | र | ■ | रा | व | ■ | ग | रू | ड | ■ |
| ग | दा | ■ | व | ल | य | ■ | पा | र | ख | ■ | म |
| ■ | न | व | स | ■ | ग | व | त | ■ | व | ज | न |
| नी | ■ | जा | ■ | ला | ड | ■ | क | र | त | ल | ■ |










## बाबा गणपती पाटपूजन सोहळा संपन्न;राम रघुवंशींची उपस्थिती

**नंदुरबार, दि.२ (प्रतिनिधी)- शहरातील श्रद्धास्थान असलेल्या श्रीमंत बाबा गणपती पाटपूजन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या पवित्र सोहळ्यात पंधरा नवविवाहित जोडप्यांनी सहभागी होऊन विधिवत पाटपूजन केले.**

या कार्यक्रमास राम भैय्या रघुवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी भाविकांनी बाबा गणपती महाराजांचे दर्शन घेतले. तसेच सर्वांच्या सुख, समृद्धी व आरोग्यासाठी प्रार्थना करण्यात आली. पाटपूजन सोहळ्यास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बाबा गणपती उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मंडळ तसेच सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. भाविकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आयोजकांनी सर्वांचे आभार मानले. या वेळी अध्यक्ष पियूष विकास सोनार, उपाध्यक्ष गौरव चंद्रशेखर सोनार आणि सचिव स्वप्निल सोनार यांच्यासह समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १ वरुन

### भाजपसोबत निवडणूक लढवून सत्ता काँग्रेससोबत

विचारसरणी आणि विरोधी पक्षासोबत केलेली युती यामुळे पक्षात फूट पडली, असा युक्तिवाद करत कौल यांनी शिंदे गटाचीच मुळ शिवसेना असल्याचा दावा केला. तसेच राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष हे एकच असल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

**पक्षांतर्गत लोकशाहीवरही सवाल**

उद्धव ठाकरे गटाकडून करण्यात आलेला युक्तिवाद चुकीच्या मुद्द्यांवर आधारित असल्याचे कौल यांनी म्हटले. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर पक्षाच्या रचनेत अचानक बदल करण्यात आले. पक्षाची रचना एका व्यक्तीच्या मर्जीनुसार झाली होती, असा आरोप त्यांनी केला. एका सहीने एखाद्याला पक्षातील जबाबदारी मिळत असेल, तर कार्यकर्त्यांचे महत्त्व काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. पक्षात लोकशाही पद्धतीने निवडणुका घेता येत नसतील, तर असा राजकीय पक्ष कसा चालवणार आणि निवडणुका कशा लढणार, असा प्रश्न उपस्थित करत पक्षांतर्गत निवडणुका होणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद कौल यांनी केला.

**पुढील सुनावणी १५ सप्टेंबरला**

सर्वोच्च न्यायालयातील या प्रकरणाची पुढील सुनावणी आता १५ सप्टेंबर रोजी होणार आहे. पुढील सुनावणीत नीरज कौल यांच्याकडून आमदारांची अपात्रता, विधानसभा अध्यक्षांचा निर्णय, निवडणूक आयोगाचा निर्णय तसेच राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यांच्यातील संबंधांवर युक्तिवाद केला जाण्याची शक्यता आहे.

### चंद्रपुरच्या आश्रमशाळेत एकतीस जणांना विषबाधा

समावेश आहे. नेहमीप्रमाणे सकाळी साडेनऊच्या सुमारास विद्यार्थी जेवण करीत असताना काही विद्यार्थ्यांना अचानक उलट्या होऊ लागल्या. जेवणातून विषबाधा झाली असावी, असा संशय आल्याने इतर विद्यार्थ्यांनी जेवण करणे टाळले. घटनेची माहिती मिळताच विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांना तातडीने उपचारासाठी जिवती येथे नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर काही विद्यार्थ्यांना पुढील उपचारासाठी राजुरा येथे हलविण्यात आले. घटनेमुळे आश्रमशाळा परिसरात पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये चिंता निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांना नेमकी कोणत्या कारणामुळे विषबाधा झाली, याबाबत तपास सुरू आहे.

### जरांगेंची प्रकृती खालावल्याने मराठा आक्रमक

टायर रस्त्यावरून बाजूला हटविले आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली.

**अधिकाऱ्यांच्या भेटीवरूनही संताप**

मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अंतरवाली सराटी येथे पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, शिष्टमंडळ प्रत्यक्ष भेटीसाठी का आले नाही, असा सवाल उपस्थित करत मराठा बांधवांनी संताप व्यक्त केला. सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी निषेध नोंदविला. मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन त्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

**यांना दंगल करायची आहे - जरांगे**

दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी, त्यांना दंगलीच घडवायच्या आहेत, असा आरोप केला. मला सगळ्या चालबाज विखे-पाटील दिसू लागला आहे. आपल्या वाट्याला गेल्यास आपण सोडत नाही. मग शिंदे असतील, फडणवीस असतील किंवा दादा असतील. विखे-पाटील आणि सावंत डोक्यावर पडले आहेत का? त्यांना गोळ्या सुरू आहेत का? गेल्या तीन वर्षांमध्ये कधीही आपल्यासोबत चर्चेसाठी जिल्हाधिकारी, एसपी आले नाहीत. हे उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम सुरू आहे. आमच्याकडे मसुदा पाठवला आहे. मात्र आम्ही सांगितले आहे की, या सगळ्या मसुद्याची अंमलबजावणी करा. दुसरीकडे हे आंदोलन मोडून काढण्याचा डाव आहे. मराठे चवताळले तर तुम्हाला सुद्धा हाताखालून काढतील. इकडे मरण्यापेक्षा जातीसाठी मरू, जातीसाठी मेल्यावर शहीद होऊ. जातीसाठी मरायचे नाही तर मग दारू पिऊन मरायचे का? अशी विचारणा सुद्धा जरांगे यांनी केली. आमच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही सुद्धा काठीच्या बदल्यात काठी होती घेणार. तुम्ही एक माणूस मारला तरी आम्ही सुद्धा एखादा तरी मारूच. आपण सर्व ओबीसी, मराठे, मुस्लिम मिळून यांना उखडून काढू. कोल्हापूर, सातारा संस्थानांच्या जीआर द्यावा. आता बारा सप्टेंबरला मुंबईकडे जाणार असल्याचे मनोज जरांगे-पाटील यांनी सांगितले.

### चक्करबर्डी परिसरातील बनावट फेरफार नोंदी रद्द

पुरावे उपलब्ध आहेत. सन १९५५ चा मुळ ७/१२ उतारा यावरून जमीन मुळची सरकारी असून ती नवीन शर्त अंतर्गत केवळ शेतीसाठी मर्यादीत स्वरूपात दिली होती.ती हस्तांतरीत करता येत नाही. शासकीय पुराव्यांची पडताळणी करून या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. सुरू असलेले खोदकाम तात्काळ थांबविण्यात यावे. अशी मागणी मी वडार महाराष्ट्राचा संघटनेचे दिपक वेताळ, अंबादास लष्कर, अशोक कुसळकर, सोमनाथ कुसळकर, भैय्या शिंदे, गणेश लष्कर, मनोज गुंजाळ, नारायण लष्कर, गणेश पवार, गोरख कुसळकर, लक्ष्मण विटेकर, रामु लष्कर, दिलीप कुसळकर यांनी केली आहे.

### वंदे मातरम प्रतिष्ठानतर्फे गणेशोत्सवाचे नियोजन

उपक्रम राबविले जातात. वंदे मातरम प्रतिष्ठानने लोकसहभागातून पेक्षा अधिक सीसीटीव्ही (आयपी) कॅमेरे चौकाचौकात लावले आहेत. या परिसरात शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आदींमुळे वाढती वर्दळ पाहता महिला, तरूणींसह आपापला भाग सुरक्षित राहण्यासाठी वंदे मातरम प्रतिष्ठानने राबविलेला हा प्रकल्प पोलिसांना मदतीचा ठरला आहे.

### चोरी झालेल्या सोन्याच्या दागिन्यांची भरपाई

केली. पोलिसांनी तात्काळ सीसीटीव्ही फुटेज तपासून एफ.आय.आर. दाखल केला. त्यानंतर सावंत यांनी नाशिककर ज्वेलर्सशी संपर्क साधला. अजय नाशिककर यांनी तत्परता दाखवत एफ.आय.आर.ची प्रत आणि विमा पॉलिसीचे कागदपत्रे विमा कंपनीकडे पाठवले.

१५.५० लाखांची भरपाई जमा

कंपनीने कागदपत्रांची पडताळणी करून अवघ्या काही दिवसांत म्हणजेच ६ जुलै २०२६ रोजी १५,५०,३४५ रुपये वंदना सावंत यांच्या बँक खात्यात जमा केले. चोरी गेलेल्या दागिन्यांची पूर्ण नुकसान भरपाई मिळाल्याने सावंत कुटुंब आणि त्यांच्या परिचितांनी आश्चर्य व्यक्त करत नाशिककर ज्वेलर्स, धुळे शहर पोलीस आणि ओ लँकर कंपनीचे मनापासून आभार मानले आहेत.

### अनधिकृत होर्डिंग-बॅनरचा ऑनलाईन पंचनामा

अनधिकृत होर्डिंग-बॅनर लावणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांनी याची गांभीर्याने दखल घ्यावी. अनधिकृत जाहिराती आणि बॅनर लावणे टाळावे. शहराच्या सौंदर्यीकरणास सहकार्य करावे आणि दंडात्मक कारवाई टाळावी, असे आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

### बॅनर लावताना वीजेचा धक्का एकवीस वर्षीय तरुणाचा मृत्यू

चेतनला जोरदार विजेचा धक्का बसला. मित्र गौरव बडगुजर याने त्याला तातडीने धुळे जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी धुळे शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. चेतनच्या मृत्यूची माहिती मिळताच त्याच्या आईसह कुटुंबीयांनी जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. कुटुंबीयांनी एकच हंबरडा फोडल्याने परिसरात शोककळा पसरली. चेतनच्या अकाली मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### जि.मध्यवर्ती सह.बँकेत सरळसेवा नोकर भरती

उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिध्द केली जाईल. यांची पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी. संबंधित उमेदवारांना कळविण्यात आलेल्या तारखेनिहाय कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी बँकेचे मुख्य कार्यालय गरूडबाग धुळे येथे हजर रहावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधरी यांनी केले आहे.

## पान १ वरुन

### महापालिकेची चार क्षेत्रीय कार्यालये सुरू

१८ व १९ साठी क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ३ कार्यरत आहे. हे कार्यालय मनपा शाळा क्रमांक ५, मालेगाव रोड, जवळ, आग्रा रोड, धुळे येथे आहे. तर प्रभाग क्रमांक ८, ९, १० व १७ साठी क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ४ असून त्याचे कार्यालय अशोक नगर, जलकुंभ, लेझिन चौक, फाशीपूल, धुळे येथे आहे.

**विविध नागरी सेवा एकाच ठिकाणी**

नागरिकांनी आरोग्य, विद्युत, पाणीपुरवठा तसेच मालमत्ता करासंबंधीची कामे आपल्या प्रभागनिहाय संबंधित क्षेत्रीय कार्यालयातून करून घ्यावीत, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. या व्यवस्थेमुळे नागरिकांना त्यांच्या परिसरातील नागरी समस्यांसाठी महापालिका मुख्यालयात वारंवार जाण्याची आवश्यकता राहणार नाही. क्षेत्रीय कार्यालय क्रमांक एक चे सहायक आयुक्त किशोर शिंदे, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक दोनचे सहायक आयुक्त सागर जकातदार, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक तीनचे सहायक आयुक्त राजेंद्र माईनकर आणि क्षेत्रीय कार्यालय क्रमांक चारचे सहायक आयुक्त किशोर वाघ यांच्याकडे संबंधित कार्यालयांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आपल्या प्रभागाचा विकास आपली जबाबदारी या संकल्पनेतून नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### आत्महत्यांचे सत्र सुरुच पुरुषाचा मृतदेह आढळला

बावस्कर यांनी शहर पोलिस ठाण्यात बेपत्ता नोंद केली. त्याचा भाऊ अनुप बावस्कर दोन सप्टेंबरला सकाळी नऊला सावळदे येथील तापी नदीच्या पुलावर गेला असता तेथे स्वप्निलची टीव्हीएस ज्युपिटर स्कूटी (एमएच १८, बीएस ३९६१) उभी होती. तेथील स्थानिक उपस्थितांनी एक सप्टेंबरला रात्री स्कूटी उभी करुन एकाने नदीत उडी टाकली आहे अशी माहिती दिली. सावळदे येथील मच्छीमारांना नदीत युवकाचा मृतदेह तरंगतांना आढळला. त्यांनी मृतदेह नदीकाठावर आणून पाहिला असता अनुप याने तो भाऊ स्वप्निल असल्याचे ओळखले. त्याने पोलिसांत दिलेल्या माहितीवरुन आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

यापूर्वी ३० ऑगस्टला कॉस्मेटिक कॉलेजची विद्यार्थिनी भाग्यश्री ज्ञानेश्वर खेडकर (वय २१) हिचा मृतदेह सावळदे येथे नदीपात्रात आढळला. एक सप्टेंबरला मोहित तथा यश ज्ञानेश्वर पाटील-देवरे (वय २१, वनावल) याचा मृतदेह गिधाडे येथील तापी नदीपात्रात आढळला. पाठोपाठ दोन सप्टेंबरला स्वप्निल बावस्करचा मृतदेह सावळदे येथे आढळला. या घटनांमुळे सामाजिक स्तरावर चिंता व्यक्त केली जात आहे.

### दत्त प्रभुंच्या मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव

प.पू. महंत अभय राजबाबा महानुभाव यांचे विशेष मार्गदर्शक लाभणार आहे. रात्री बारा वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा साजरा होईल.या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन निझोरे परिवार (सोनगीर), श्री दत्त मंदिर ग्रुप, तसेच निमंत्रक मोतीलाल कौतिक महाजन व आयोजक न्यू हॉटेल स्वागत (सोनगीर फाटा) आणि स्वागत पेट्रोलियम (देवभाने फाटा) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### शेतकरी परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन

जळगावचे वरिष्ठ शास्त्रज्ञ बी.डी.जडे मार्गदर्शन करणार आहेत. प्रास्ताविक शेतकरी संघटना धुळेचे अध्यक्ष पी.डी.देवरे करणार आहेत.

### बोरकुंड औषध निर्माणशास्त्र विद्या.त

औषधांच्या गुणवत्ता नियंत्रणातील ड्रग इन्स्पेक्टरचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. फार्मसी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ड्रग इन्स्पेक्टर हे एक महत्त्वाचे करिअर क्षेत्र असून, या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील संधी व परीक्षेच्या तयारीबाबत स्पष्ट दिशा मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.मेहुल ठाकरे शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी या चर्चासत्रास उपस्थित होते.



रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...



शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

### राजकारणासह प्रशासनात मराठी भाषेचा मुद्दा नेहमीच संवेदनशील- हरीष कदम

**शहादा,दि.०२(का.प्र.)- महाराष्ट्राच्या राजकारणात आणि प्रशासनात मराठी भाषेचा मुद्दा नेहमीच संवेदनशील राहिला आहे. मात्र, सध्या सरकारच्या एका निर्णयामुळे प्रशासकीय यंत्रणेचा दुटप्पीपणा आणि उघडउघड होणारा दुजाभाव पुन्हा एकदा ऐरणीवर आला असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते हरिष कदम यांनी व्यक्त केले आहे.**

मुंबईत ज्या रिक्षाचालकांना मराठी बोलता किंवा वाचता येत नाही, त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारत थेट परवाने रद्द करण्याचे फर्मान प्रशासनाने सोडले आहे. दिवसभर उन्हा-तान्हात कष्ट करून दोन वेळच्या भाकरीची भ्रांत मिटवणाऱ्या या सर्वसामान्य कष्टकऱ्यांच्या थेट पोटावरच पाय देण्याचा हा प्रकार आहे. परंतु, हाच न्यायाचा निकष उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना लावताना सरकारचे हात आखडतात का, असा सवाल आता उपस्थित होत आहे.एकीकडे रोजंदारीवर जगणाऱ्या रिक्षाचालकाचा रोजगार मराठीच्या नावाखाली हिरावून घेतला जात असताना, दुसरीकडे उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड यांसारख्या राज्यांतून आलेले सनदी अधिकारी महाराष्ट्रात उच्च पदांवर विराजमान आहेत. यातील अनेक अधिकाऱ्यांना मराठीचे शून्य ज्ञान असतानाही त्यांना भल्यामोठ्या पगाराची पॅकेजेस, लाल दिवे आणि व्ही.आय.पी. सन्मान दिला जात आहे.शहादा व तळोदा यांसारख्या आदिवासी व ग्रामीण भागात उपविभागीय अधिकारी पदांवर परप्रांतीय अधिकाऱ्यांचे लाड पुरवले जात आहेत.सर्वसामान्य मराठी माणूस जेव्हा आपल्या समस्या घेऊन प्रशासकीय दरबारी जातो, तेव्हा त्याच्या अर्जाचा साधा थांगपत्ताही या अधिकाऱ्यांना लागत नाही.

मराठी भाषेची अस्मिता जपायची असेल, तर पहिला नियम जिल्ह्याची सूत्रे हातात असणाऱ्या या उच्चपदस्थांना का लागू केला जात नाही? बड्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालायचे आणि गरिबांची चूल बंद करायची, हा सरकारचा कारभार म्हणजे न्याय नसून निव्वळ दुजाभाव असल्याची घणाघाती टीका हरिष कदम यांनी केली आहे.

## पान १ वरुन

### दोन कोटी सात लाख बोगस मतदारांच्या

बोगस मतदार असल्याचे आपण महाराष्ट्रात सर्वप्रथम आणि स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले होते, असे गोटे यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, त्यावेळी महाराष्ट्र निवडणूक आयोगाने आपल्या या दाव्याला दुजोरा दिला नव्हता, असे माजी आमदार अनिल गोटे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. महापालिका निवडणुकीत पैशांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्यामुळे विधानसभा निवडणूक प्रभावित झाली. विधानसभा निवडणुकीपूर्वीच बोगस मतदारांच्या नोंदणीबाबत आणि पैशांच्या वाटपाबाबत महायुतीमध्ये एकमत झाले होते, असा गंभीर आरोप गोटे यांनी केला. तू चूप राहा, मी चूप राहतो अशा स्वरूपाच्या अभद्र युतीमुळे महाराष्ट्रात अत्यंत कुचकामी, भ्रष्ट आणि लुटारूंचे सरकार सत्तेत आले असल्याची टीकाही त्यांनी केली. महाराष्ट्रातील जनता अन्य राज्यांपेक्षा सुज्ञ, समजदार आणि प्रगत असून, अशा नालायक लोकांना जनता कायमस्वरूपी स्वीकारणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**प्रश्नांशी देणे-घेणे नाही**

सत्तेवर आल्यानंतर सरकारला जनतेच्या प्रश्नांशी काही देणे-घेणे राहिलेले नाही. हृदयशून्य लोकांचे जंगलराज महाराष्ट्राच्या जनतेच्या उरावर बसले असल्याची टीका गोटे यांनी पत्रकात केली आहे. दरम्यान, आगामी नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये विधानसभा निवडणुकीतील मतदार यादी गृहीत धरली गेल्यास सत्तारूढ पक्ष व्यतिरिक्त अन्य पक्षांना विजयाची संधी मिळणे कठीण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. महाराष्ट्रातील जनतेने या गंभीर विषयाची गांभीर्याने दखल घेणे अपरिहार्य असल्याचेही गोटे यांनी पत्रकात म्हटले आहे.

### जि.परिषद समोर शालेय पोषण आहार कामगारांचे

१००० रुपयांची मानधन वाढ त्वरित लागू करून त्याचा थकीत फरक (ॲरिअर्स) देण्यात यावा, तसेच विनाकारण व चौकशी न करता कामावरून काढलेल्या कामगारांना १८ डिसेंबर २०२३ आणि ५ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार तातडीने पूर्ववत कामावर घेण्यात यावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. याशिवाय वाढत्या महागाईचा विचार करता कामगारांना दरमहा किमान ३०,००० रुपये वेतन देण्यात यावे आणि सध्याची कंत्राटी पद्धत पूर्णपणे बंद करून सर्व नवीन कामगारांशी अधिकृत सेवा करार करण्यात यावा, या मागण्यांचाही समावेश आहे.

या निवेदनावर सीआयटीयू धुळे/नंदुरबार अध्यक्ष कॉ. एल.आर. राव, शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष कॉ. शरद पाटील, कॉ. दीपक सोनवणे, कॉ. ममता पाडवी, कॉ. लक्ष्मी पाडवी, कॉ. कुमुदिनी कुवर आणि कॉ. नरेंद्र गिरासे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. मागण्यांवर त्वरित सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

### गुटखा विक्री विरोधात युवासेनेसह

हटवण्यात याव्यात. दोषींवर गुन्हे दाखल: गुटखा पुरवठादार आणि विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासन तसेच पोलिसांनी कठोर कलमांखाली गुन्हे दाखल करावेत. शैक्षणिक परिसरात पोलीस प्रशासनाकडून नियमित गस्त सुरू करण्यात यावी.

प्रशासनाने यावर तत्काळ आणि ठोस कारवाई केली नाही, तर यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा युवासेना जिल्हा प्रमुख कुणाल कानकाटे महानगर प्रमुख मनोज जाधव महानगर चिटणीस जयेश फुलपगारे महानगर समन्वयक तरबेज शेख, अविनाश जोंधळे यांनी दिला आहे.

### घर खाली करण्यासाठी एक लाखाची खंडणीची मागणी

संजय माळी (रा. तिरुपती नगर, देवपुर) त्याने एक लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. कमलाबाई पाटील यांचा मुलगा अतुल याला शिवीगाळ, दमदाटी केली, या आशयाची फिर्याद कमलाबाई पाटील यांनी दिली. त्यानुसार संशयितांविरुद्ध देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक के. डी. पाटील तपास करीत आहेत.

### चर्मकार समाजातील गुणवंतांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**धुळे, दि.२- चर्मकार समाज विकास मंडळ धुळे जिल्हा यांच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त तसेच विविध क्षेत्रात विशेष ने पुण्य प्राप्त केलेले विद्यार्थी यांचा भव्य गुणगौरव व सत्कार समारंभ सैनिक लॉन्स येथे आयोजित करण्यात आला होता**

चर्मकार समाज विकास मंडळाचे वतीने इयत्ता दहावी बारावी परीक्षेत यश संपादन केले

समाजात विविध क्षेत्रात यश संपादन करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात सुमारे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार गुण गौरव समितीचे अध्यक्ष रतकाकर वसईकर, चर्मकार समाज विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव नेरकर, बालरोग तज्ञ डॉ.सुरेश वसईकर, गायक प्राध्यापक पं. घन:श्याम थोरात, नारायण नेरकर, डॉ. प्राचार्य मीनाक्षी गवळे, डॉ.प्राचार्य शांताराम बाविस्कर यांच्या हस्ते गुणगौरव सत्कार करण्यात आला

कार्यक्रम यशस्वीतेसाठी बीटी गवळे भिकनराव वानखेडे भीमराव वाघ दयाराम माले गणेश वाघ मनोज वाघ दिलीप सोनवणे मनोज मोरे रमेश बागुल नरेंद्र वसईकर आशितोष वसईकर तेजपाल बागले चेतन महाले चेतन मोरे शरद गांगुर्डे रमेश नेरकर यांच्यासह असंख्य समाज बांधवांनी कार्यक्रम यशस्वी साठी प्रयत्न केले. आभार प्रदर्शन गणेश वाघ यांनी केले.

**पाहिजेत**
१. रिसेप्शनिस्ट ... ०२
२. लॅब टेक्नीशियन ... ०२
३. कलेक्शन बॉय ... ०३
(BLOOD SAMPLE)
४. कॉम्प्युटर ऑपरेटर...०१
(CMLT/DMLT)
असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे.
वेळ : १२ ते ५ वाजेपर्यंत.
हाय-टेक पॅथॉलॉजी लॅब
गल्ली नं. २, जुनी महामनगरपालिके मागे ॲक्सीस बँकेशेजारी, धुळे.
9403261209

**पाहिजेत**
अनुभवी सेल्समन पाहिजेत पगार अनुभवाप्रमाणे देण्यात येईल.
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
अकबर चौक, गल्ली नं.२, धुळे
9422286958



गणपती बाप्पा मोरया
बाप्पाच्या आवडीचे मोदक
फक्त मदर्स किचनमध्येच
१) उकडीचे मोदक
२) ओल्या नारळाचे तळणीचे मोदक
३) गौरी फराळ
(अनारसे, करंजी, चकली, चिरोटे, लाडू)
नोंदणी आवश्यक
मदर्स किचन
फुलवाला चौक धुळे.
9049902201, 7887750864

**पाहिजेत**
१) मुली/महिला सेल्स Executive
२) मुली/महिला Exhibition Executive
३) मुली/महिला Retail Executive
फक्त मुली/महिलांना प्राधान्य दिले जाईल.
आपला Resume व आधार कार्ड सह भेट
वेळ- Manisha's food Product's shree hakur watch Company Agra road, Phoolwala chowk, Dhule

**विकणे आहे**
ऊस गल्ली मध्ये 13'X 55" जागा विकणे आहे.
-: संपर्क :-
7020469216

**पाहिजेत**
१) रिसेप्शनिस्ट कॉलेजच्या मुलींना प्राधान्य- १
२) सिस्टर - स्त्री २
डॉ.संदिप शिलाहार
9822311109

**पाहिजेत**
होलसेल मेडिकल दुकानासाठी
१) कॉम्प्युटर ऑपरेटर (महिला)- जागा २
२) हेल्पर - जागा १
३) सेल्समन- जागा २
-: समक्ष भेटा :-
श्री साई फार्मा
ग.नं.५, धुळे.

**पाहिजेत**
कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच ॲण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

**पाहिजेत**
१ ग्राफिक्स डिझायनर मुलगा पाहिजे कोरल ड्रॉ आणि मराठी टायपिंग येणे आवश्यक
-:समक्ष भेटा :-
नहुष डिजिटल प्रिंटर्स, धुळे
8788942027
9028921347

**पाहिजेत**
क्लिनिकच्या कामासाठी मुलगी/लेडीज पाहिजे
साई स्किन केअर & डेंटल
सेंटर, जयहिंद ज्युनिअर-सिनिअर कॉलेज लिंक रोड, एसबीआय बँकेच्या बाजुला, देवपूर, धुळे.
9823628873

**पाहिजेत**
दुकान कामासाठी माणूस/मुलगा पाहिजे पार्ट टाईम/फुल टाईम
-: समक्ष भेटा :-
अन्नपूर्णा जलगाववाला
मावा कुल्फी. आग्रा रोड, गांधी चौक, धुळे

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर .



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०